**भाडेपटटयाने/कब्जेहक्काने प्रदान केलेल्या शासकीय जमिनींवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील <u>सदस्यत्वाबाबत....</u>**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्र.जमीन-२०१७/प्र.क्र. ९८/ज-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**दिनांक : ०७ जुलै, २०१७**

<u>संदर्भ</u> :-

१. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एलसीएस-१०८३/१८८२/प्र.क्र.२२२/जी-४, दि.१२.०५.१९८३.

२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एलसीएस-१०९५/प्र.क्र.३७/९५/ज-१, दि.०९.०७.१९९९.

३. महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र.एलसीएस-१०/२००२/प्र.क्र.३४४/९५/ज-१, दि.०३.०७.२००३.

४. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एलसीएस-०६०६/प्र.क्र.५४/ज-१, दि.२५.०५.२००७.

५. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एलसीएस-०९/२०१३/प्र.क्र.४५०/पुनर्बांधणी/ज-१, दि.०१.०६.२०१५.

<u>प्रस्तावना</u> :-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम-४० व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ च्या नियम-२७ मधील तरतूदींनुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांची निवासी प्रयोजनार्थ शासकीय जमीन प्रदानाबाबतची मागणी आणि गुणवत्ता विचारात घेवून, शासकीय जमीन संबंधीत संस्थांना कब्जेहक्काने अथवा भाडेपट्याने सवलतीच्या दराने प्रदान करण्यात येते. या संबंधातील धोरण संदर्भाधिन क्र.२ वरील या विभागाच्या शासन निर्णय दि.०९.०७.१९९९ अन्वये निश्चित करण्यात आले होते. त्यानंतर या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व आदेशांचे संकलन करुन संदर्भाधीन क्र.४ वरील दि.२५.५.२००७ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तथापि, अनेक प्रकरणांमध्ये शासनाने प्रदान केलेल्या जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांनी सक्षम प्राधिका-यांची परवानगी न घेताच काही व्यक्तींना सदस्यत्व बहाल केल्याचे दिसून येते. तसेच, काही प्रकरणी अशा पध्दतीने सदस्यत्व मिळालेली व्यक्ती मयत असल्याचे किंवा त्याने सदनिकेचे अन्य व्यक्तीस हस्तांतरण केल्याचेही दिसून येते. त्यामुळे अशा प्रकरणी पूर्वी झालेल्या अशा व्यवहारांना/शर्तभंगांना नियमानुकूल करण्याची कार्यवाही कोणत्या



Scanned with OKEN Scanner

निकषांचा वापर करून त्यास कार्योत्तर मंजूरी द्यावी या अनुषंगाने क्षेत्रिय महसूली यंत्रणांना दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत सर्वंकष विचार करुन शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे:-

**<u>शासन निर्णय</u>:-**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतुदींनुसार शासकीय जमीन प्रदान करण्यात आलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये संबंधीत संस्थेने सदस्यत्व प्रदान केलेल्या, मात्र, अद्याप अशा व्यक्तीच्या सदस्यत्वास शासनाची / सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी प्राप्त न झालेल्या प्रकरणांत खालील कार्यपध्दती अनुसरून अशी प्रकरणे जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर नियमानुकूल करण्यास या निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे:-

**(१) <u>सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदस्यांच्या सदस्यत्वाबाबतची परिस्थिती:-</u>**

**(अ)** सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सदस्यत्व एखादया व्यक्तीस प्राप्त झालेले असेल मात्र, अशा मूळ सदस्याच्या सदस्यत्वास शासनाची/सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता मिळालेली नसेल आणि अशी व्यक्ती हयात असून अशा सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये सदनिका धारण करीत असेल, तर,

किंवा

**(ब)** सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सदस्यत्व एखादया व्यक्तीस प्राप्त झाले असेल, मात्र अशा मूळ सदस्याच्या सदस्यत्वास शासनाची/सक्षम प्राधिका-याची मान्यता मिळालेली नसेल आणि अशी व्यक्ती मयत असून अशा व्यक्तीचे वारस सदरहू सदनिका धारण करीत असतील, तर,

किंवा

**(क)** सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सदस्यत्व एखादया व्यक्तीस प्राप्त झाले असेल, मात्र अशा मूळ सदस्याच्या सदस्यत्वास शासनाची/सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता मिळालेली नसेल आणि अशा व्यक्तीने सदरहू सदनिकेची अन्य व्यक्ती / व्यक्तींना विक्री केलेली असेल, तर

**(२) <u>उक्त परिस्थितीनुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदस्यांचे सदस्यत्व नियमानुकूल करण्याची कार्यपध्दती:-</u>**

अशा व्यक्तींच्या बाबतीत त्यांना संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेने ज्या दिनांकाला सदरहू संस्थेचे सदस्यत्व बहाल केले असेल, त्या दिनांकाला अशा सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सदस्यत्व मिळण्यासाठी विहित असलेली पात्रता अशी व्यक्ती धारण करीत होती,



Scanned with OKEN Scanner

याची खातरजमा करुन अशा व्यक्तीच्या **सदस्यत्वास** जिल्हाधिका-यांच्या स्तरावरुन ***कार्योत्तर मंजूरी*** देणे अनुज्ञेय राहील.

सक्षम प्राधिका-याकडून सदस्यत्व मंजूर होण्यापूर्वीच मूळ सदस्यांकडून संबंधित सदनिकेचे हस्तांतरण अन्य व्यक्ती / व्यक्तींना झाले असल्यास, प्रथमत: वरीलप्रमाणे मूळ सदस्याच्या सदस्यत्वास कार्योत्तर मंजूरी प्रदान केल्यानंतर, अशा मूळ सदस्यांकडून संबंधित सदनिकेच्या झालेल्या हस्तांतरणास प्रचलित धोरणानुसार "***हस्तांतरण शुल्क*** " आकारुन कार्योत्तर मान्यता देता येईल. हस्तांतरणास अशी कार्योत्तर मान्यता देताना हस्तांतरीतीने मूळ सदस्यांसाठी विहित केलेली अर्हता धारण करण्याची अट लागू करण्यात येवू नये.

त्याचप्रमाणे सक्षम प्राधिका-याकडून सदस्यत्व मंजूर होण्यापूर्वी मूळ सदस्य मयत झाल्यास व संबंधित सदनिका वारसाच्या ताब्यात असल्यास मूळ सदस्यांच्या सदस्यत्वास वरील प्रमाणे कार्योत्तर मंजूरी दिल्यानंतर त्याच्या कायदेशीर वारसांच्या नांवे सदस्यत्व मंजूर करण्यात यावे, अशा वेळी मूळ सदस्याच्या कायदेशीर वारसाने सदस्यत्वासाठी विहित अर्हता धारण करण्याची अट लागू करण्यात येवू नये.

०२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमती व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १८७/२०१७/व्यय-९, दिनांक ७/६/२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

**०३.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. **२०१७०७०७१६५९१०४४१९** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**(राजेंद्र क्षीरसागर)**
**शासनाचे उप सचिव**

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२.
१०.प्रधान सचिव,(महसूल,मुद्रांक शुल्क व नोंदणी) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. सर्व विभागीय आयुक्त/उपायुक्त (महसूल) विभागीय आयुक्तांचे कार्यालय.
१३. सर्व जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी.
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१५. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१७. निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
१८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१९. उप सचिव (ज-१) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. सर्व सह सचिव/उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१. कक्ष अधिकारी (ल-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२. "ज" समूहातील सर्व अवर सचिव/कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३. निवडनस्ती (ज-१)

*****



Scanned with OKEN Scanner